# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ०९/०२/२०२३ (गुरूवार)

---

## अपहार

**पोलीस स्टेशन बेला :—** अंतर्गत मौजा चिमनाझरी १२ किमी पश्चिम. येथे दिनांक ०८/०२/२३ चे १८/०० वा. दरम्यान यातील आरोपी नामे— महनाज उर्फ कबिर अब्दुल हुसैन वय २७ वर्ष रा सरकारी शाळेजवळ डोडाज डुडाज ता जि राजौरी जम्मु काश्मीर यास त्याचा मालक महेंद्र कुमार पचार रा भिवंडी जि ठाणे याने त्याचा कंटेनर क्र एम एच ०४ जे यु ७७५१ हा त्याचा ताब्यात चालविण्याकरीता दिला असता, आरोपी याने मालकाला न सांगता कंटेनर क्र एम एच ०४ जे यु ७७५१ च्या **गाडीच्या मागचे ०४ टायर अंदाजे किमती ६०,०००/—रू व १५० लीटर डीजल किंमत १५,०००/—रू असा एकुण ७५०००/—रू चा माल काढुन स्वताच्या फायद्यासाठी घेवुन अपहार** केला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— दिनेश चोलो महतो वय ३३ वर्ष रा नरकी कला नवाडीहा ता जि हजारीबाग झारखंड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपी नामे— महनाज उर्फ कबिर अब्दुल हुसैन वय २७ वर्ष रा सरकारी शाळेजवळ डोडाज डुडाज ता जि राजौरी जम्मु यांचे विरूध्द कलम ४०८ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि राहुल ठेगणे मो क्र ९८२३३६४१४७ हे करीत आहे.

## आग लागुन नुकसान

**पोलीस स्टेशन उमरेड** :— अंतर्गत मौजा बेसुर २० किमी दक्षिण. यातील फिर्यादी हे दिनांक ०८/०२/२०२३ चे ०५/०० ते ०५/३० वा. दर. यातील फिर्यादीने चंद्रशेखर दौलत गिरडे रा. जवाहरनगर भंडारा यांची ८ एकर शेती मौजा बेसुर शिवारात असुन ती चन्याकरिता ठेक्यांनी केलेली असुन शेतामध्ये चना पेरलेला होता. सदर चना कापनी करीता आल्याने शेतातील चना काढुन चरण्याकरिता शेतातच ५ दिवस अगोदर चन्याची गंजी मारून ठेवली होती. घ ता वेळी फिर्यादी घरी हजर असता त्याच्या शेतात कामावर ठेवलेला अमोल उध्दव नगरारे रा. बेसुर यांनी फोनवर माहीती दिली की, तुमचे शेतात असलेल्या चनाची गंजी जळत आहे, असे सांगितलेवरून फिर्यादीने शेतावर जावुन पाहीले असता शेतातील चन्याची गंजी जळालेली दिसली. **सदर चन्याचे गंजीमध्ये ८ एकर मधील चना कापुन ठेवलेला होता व अंदाजे ६० बोरे चना होण्याची शक्यता होती. चन्याची गंजी जळाल्याने फिर्यादीचे ८०,००० रू ते १,००,००० रूपयाचे** नुकसान झाले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रूपराव विनायकराव गिरडे वय ५१ वर्ष रा. बेसुर ह. मु. ओमनगर उमरेड मो. क्र. ९३७०१६९०२३ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४३५ भादवी. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो हवा/ भोजराज झाडे मो. क्र. ८९९९४३२७२ हे करीत आहे.

## निर्दयतेने प्राण्यांची वागणुक करणा—या विरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन केळवद** :— अंतर्गत मौजा उमरी ब्रीज ते भागेमाहेरी बस स्टॉप १५ कि.मी पश्चिम. येथे दिनांक ०८.०२.२०२३ चे ०६.०० ते ०६.३० वा दरम्यान, फिर्यादी यांनी मुखबिरद्वारे मिळालेल्या खबरेवरुन स्टॉप च्या मदतीने नाकाबंदी करीत असता यातील पांढ—या रंगाची महिन्द्रा बोलेरो पिक अप क्र एम.एच—४९ एटी ६६०१ हिला नाकाबंदीच्या ठिकाणी थांबविण्याचा इशारा केला असता नाकाबंदीचे ठिकाणी न थांबता तो वाहनासह नागपुर च्या दिशेने लोकांच्या जिवीतास धोका होईल अश्या स्थितीत वाहण चालविताना पळु लागला त्यांचा पाठलाग केला असता आरोपीच्या गाडीचे भागेमाहेरी फाटा येथे टायर फुटल्याने पांढ—या रंगाची महिन्द्रा बोलेरो पिक अप चा चालक याने आपले वाहन रोडचे बाजूला उभे करून अंधाराचा फायदा घेउन शेतात पळुन गेला त्यांचा पाठलाग केला असता मिळुन आले नाही. सदर वाहणाची पाहणी केली असता महिन्द्रा बोलेरो पिक अप मधील मागच्या डाल्यात **१) ०४ नग काळ्या रंगाच्या गौवंश प्रत्येकी किमत १५,०००/— रूपये प्रमाणे एकूण किंमत ६०,०००/—रु २) ०५ नग पांढ—या रंगाच्या गोवंश प्रत्येकी १५,०००/—रुपये प्रमाणे ७५,०००/— रू ३) ०६ नग भू—या रंगाच्या गौवंश प्रत्येकी किंमती १५,०००/— प्रमाणे एकूण ९०,०००/— रू ०४) महिन्द्रा बोलेरो पिक अप क्र एम.एच—४९ एटी ६६०१ किंमत—५,००,०००/— रू असा एकुण ७,२५,०००/ रू चा माल** मध्यप्रदेश येथुन गाई गौवंश जनावरे अत्यंत क्रूर व निर्दयतेने डांबुन आखुड दोरीने बांधुन त्यांना चारा पाण्याची सोय न करता कोबुंन दाटीवाटीने अपु—या जागेत ठेवुन कत्तली करीता वाहतुक करतांना मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सरतर्फे पो शि सचिन भगवान येळकर वय ३१ वर्ष रा पो स्टे केळवद जि. नागपूर ग्रा. यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे महिन्द्रा बोलेरो पिक अप क्र एम.एच—४९ एटी ६६०१ चे चालका विरूध्द कलम २७९,३३६ भा.द.वि.सह कलम ११(१)(घ)(ड)(च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधि. १९६० सह कलम ५ (अ),९ महाराष्ट्र प्राणी सरंक्षण अधिनीयम १९९५ सह कलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनीयम , सहकलम १८४ मोवाका प्रमाणे गुन्हा नोंद करून तपासात घेण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो उप नी कामठे ९९२३२१०३४४ हे करीत आहे.

## फसवणुक

**पोलीस स्टेशन सावनेर** :— अंतर्गत गुरारीकर ले आउट खापा रोड सावनेर २ किमी उत्तर. येथे दि. ०७.०२.२३ चे १८.०० वा दरम्यान, यातील अनोळखी दोन्ही आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे अंगावरील सोन्याचे गोफ, चैन अंगठी व लॉकेट एकुण २४ ग्रॅम कि. ६०,०००/— रू चे काढण्यास सांगुन ते फिर्यादिचे रूमाल मध्ये टाकले आहे, असे सांगुन घरी जाण्यास सांगितले. फिर्यादीने घरी जावून रूमाल खोलुन पाहले असता त्यामध्ये दगड निघाले. आरोपीतांनी रूमाल मध्ये सोन्याचे भांडे न ठेवता दगड ठेवुन फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अशोक गंभीर धरममाळी वय ६७ वर्ष रा गुरारीकर ले आउट खापा रोड सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे अनोळखी आरोपी विरूध्द कलम ४१९, ३४ भादवी चा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास — पो हवा/ पांडे मो.न ७९७२४३१२३८ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**